CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १६ मे २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : २२६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## शेळगीत गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका २३ वर्षीय तरुणाने स्वतःच्या हेअर कटिंग दुकानात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शेळगी येथील विद्यानगरात गुरुवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. शुभम सिद्धेश्वर राऊत (वय २३ रा. विद्यानगर नं. २, शेळगी) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. सकाळी सातच्या सुमारास त्याच्या घराच्या पुढील बाजूस असलेल्या स्वतःच्या समर्थ हेअर कटिंग नावाच्या दुकानातील छताच्या लोखंडी अँगलला त्याने कटिंग करण्याच्या कापडाच्या सहाय्याने गळफास घेतला. त्याला वडिलांनी फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

## पेट्रोलच्या भडक्याने तरुण जखमी

✔ **सोलापूर** : पैशाच्या व्यवहारातून दुसऱ्याच्या घरासमोर असलेल्या वाहनावर पेट्रोल ओतून आग लावली. त्यावेळी आगीच्या भडक्याने तरुण भाजून जखमी झाला. ही घटना एमआयडीसी परिसरातील सुनिल नगर येथे गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली. राजेश बाळू हंचाटे (वय २८, रा. गवळीवस्ती) असे भाजलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पैसे देण्याघेण्याच्या व्यवहारातून त्याचे सुनीलनगर परिसरातील इसमाबरोबर तक्रार झाली होती. त्याचा राग धरून राजेश हंचाटे हा सुनिलनगर येथे त्या इसमाच्या घरासमोर लावलेल्या वाहनावर पहाटेच्या सुमारास पेट्रोल ओतून आग लावली होती.

# सोलापूर महापालिकेची निवडणूक ४ नगरसेवक पद्धतीने होणार

## ६० दिवसांत नवी प्रभाग रचना; यापूर्वीची सगळीच मेहनत अवकाळीच्या पाण्यात

**ओबीसी आरक्षण गृहित धरुन नव्याने निघणार आरक्षण सोडत**

**भाजपपूरक होणार प्रभाग रचना निश्चित**

**दोन महिन्यात प्रभाग रचना करण्याच्या सूचना**

**यापूर्वी हिरमोड झालेल्यांना पुन्हा नशीब फळाला येण्याची आशा**

✔ **सोलापूर/खास प्रतिनिधी**

बहुप्रतिक्षीत सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीला आता वेग येणार आहे. त्याला कारणदेखील तसेच आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतर्गत महापालिकांसाठी नव्याने प्रभाग रचना तयार करुन घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. त्यानुसार, येत्या ६० दिवसांत सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी नव्याने प्रभाग रचना करण्यात येणार आहे. प्रभाग रचना तयार करण्यासाठी सर्वसाधारण ६० दिवसांची मुदत आहे, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार राज्य मंत्रिमंडळाला आहेत. भाजपपूरक ४ सदस्यीय पद्धतीची प्रभाग रचना असेल अशी माहिती अधिकृत सूत्रांकडून मिळाली आहे. विशेषत्वे, नव्याने तयार होत असलेल्या प्रभाग रचनेवर महायुती त्यापेक्षाही भाजपचा वरचष्मा निश्चिपणे राहणार आहे. नव्याने प्रभाग रचना तयार झाल्यानंतर आरक्षण सोडत काढली जाईल. तद्नंतर खऱ्या अर्थाने निवडणुकीला रंग भरणार आहे.

विशेष म्हणजे यापूर्वी तयार करण्यात आलेली प्रभाग रचना आणि आरक्षण सोडत सध्याच्या अवकाळी पावसात वाहून गेल्याची स्थिती आहे. यापूर्वीची सगळी मेहनत अक्षरश: वाया गेल्याचे मानले जात आहे. तर दुसरीकडे यापूर्वी निघालेल्या प्रभाग आरक्षण सोडतीत ज्यांना हिरमोड झाला, त्यांच्या पुन्हा आशा पल्लवीत झाल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिले होते. त्यानंतर आता राज्य निवडणूक आयोग सक्रिय झाले आहे. त्याच पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने सरकारला महत्वाचे आदेश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा, असे निर्देश सरकारला देण्यात आला आहेत.

६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्वाचे निर्देश दिले होते. 'चार महिन्यांच्या आत रखडलेल्या निवडणुका घ्या' असे सुप्रीम कोर्टाने सांगितले होते. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ठराविक वेळेत घ्या. उर्वरित वादाचे मुद्दे टाळा, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले होते. कोर्टाच्या या आदेशानंतरच आता राज्य निवडणूक आयोग या निवडणुका घेण्यासाठी सक्रिय झाला आहे. त्याच पार्श्वभूमीवर, आता राज्य निवडणूक आयोगाने सरकारला महत्वाचे निर्देश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा, असे आदेश देण्यात आले आहेत. निवडणुका घेण्यासाठी महापालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचना तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे आदेश आयोगाने राज्य सरकारला बुधवारी दिले.



राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

### ओबीसी आरक्षण गृहित धरुन आता नव्याने आरक्षण

याअगोदर सोलापूर महापालिकेसाठी २०२२ मध्ये जे आरक्षण जाहीर करण्यात आले होते. त्यावेळी ओबीसी आरक्षण वगळता सर्वसाधारणसह इतर जात प्रवर्गांचा विचार करुन आरक्षण सोडत काढण्यात आली होती. यावेळी ९५ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी निघाल्या होत्या. तर १८ जागेवर अनुसूचित जाती आणि जमातीसाठी सुटल्या होत्या.

### महेशआण्णा कोठेंची निश्चितपणे येणार आठवण

सोलापूर शहर आणि विस्तारीत भागाची स्व. महेश कोठे यांना खडान्‌खडा माहिती होती. महापालिकेच्या निवडणूक प्रभाग रचनेसाठी त्यांचे मार्गदर्शन अधिकारी घेत होते. तत्कालीनवेळी प्रभाग रचनेवर महेशअण्णा कोठेंचा 'वरचष्मा' राहात होता, हे सर्वश्रुत आहे.

### तिघा आमदारांसह भाजप पदाधिकाऱ्यांचा प्रभाग रचनेवर करिष्मा

सोलापूर शहर आणि हद्दवाढ भागाशी संबंधित आमदार देवेंद्र कोठे, आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख हे सोलापूर महापालिकेच्या प्रभाग रचनेत खास करुन लक्ष घालतील. शिवाय महायुतीमधील त्यापेक्षा भाजप पदाधिकाऱ्यांचा वरचष्मा प्रभाग रचनेवर असू शकतो. अजित पवार राष्ट्रवादी गटाचे तसेच शिंदे शिवसेना गटाचे नेते प्रभाग रचनेत किती स्वारस्य दाखवितात हे पाहावे लागेल.

### ३ सदस्यीय प्रभाग रचनेत ३८ प्रभाग अन् ११३ उमेदवार आता चार सदस्यीय प्रभाग रचनेत काय राहणार स्थिती?

यापूर्वी ३१ मे २०२२ रोजी सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना आणि त्या अनुषंगिक आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. यावेळी ३ सदस्यीय प्रभाग रचना निश्चित करण्यात आली होती. एकूण ३८ प्रभाग करण्यात आले होते. ११३ नगरसेवकपदाच्या ११३ जागा फिक्स झाल्या होत्या. तेवढ्या जागांसाठीचे ओबीसी वगळता आरक्षण निघाले काढण्यात आले होते.

### प्रभाग रचनेसाठी सर्वसाधारण 'हे' निकष

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, नव्याने प्रभाग रचना करताना शहराची लोकसंख्या, नैसर्गिक स्थिती आणि भौगोलिक परिस्थिती यासंबंधी निवडणूक आयोगाने हे निकष यापूर्वी घातून दिले आहेत ते लक्षात घेऊन प्रभाग रचना केली जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

## राज्यातील महापालिका निवडणुकीसाठी २०२२चीच प्रभाग रचना कायम राहील

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्पष्टोक्ती

✔ **पुणे/प्रतिनिधी**



सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार २०२२ मध्ये जी प्रभाग रचना होती, तीच प्रभाग रचना राज्यातील महापालिकांच्या निवडणुकीसाठी राहणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यातील महापालिका आयुक्त आणि नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांच्या यशदा येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेस शिंदे यांनी गुरुवारी (दि. १५) भेट दिली. त्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोगाचे काम सुरू झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०२२ नुसारच प्रभाग रचना असेल. आम्ही लोकसभा, विधानसभा निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढलो. आता येणाऱ्या महापालिकांच्या निवडणुकाही आम्ही महायुतीच्याच माध्यमातून लढणार आहोत.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) विकास आराखड्यात (डीपी) काही त्रुटी होत्या, त्यावर आक्षेप आले होते. या त्रुटी दूर करून नवीन डीपीमध्ये सर्वसामान्यांचे हित जपले जाईल, नियोजित शहर करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असेही शिंदे म्हणाले.

## पोहताना पुण्यातील तरुणाचा मृत्यू

✔ **सोलापूर** : लग्नाच्या कार्यक्रमासाठी पुण्याहून सोलापुरात आलेला १९ वर्षीय तरुण तलावातील पाण्यात बुडून मयत झाला. ही घटना हिप्परगा तलाव येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. केदारनाथ नामदेव कसबे (वय १९, रा. चतुशिंगी, पुणे) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो लग्नाच्या कार्यक्रमासाठी सोलापुरातील तळे हिप्परगा परिसरात आला होता. गुरुवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास तो काही नातेवाईकांसोबत हिप्परगा तलाव येथे आंघोळीसाठी गेला होता. त्यावेळी तोल जाऊन पाण्यात बुडाला.

## तिहेरी अपघातात बालकाचा मृत्यू; दहाजण जखमी

### महूद शिवारातील घटना

✔ **सांगोला** : रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला भरधाव वेगात येणाऱ्या आयशर टेम्पोने जोरदार धडक दिल्याने ही कार पुढे उभ्या असलेल्या दुसऱ्या कारवर आदळली. या तिहेरी अपघातात लहान मुलाचा मृत्यू झाला तर १० जण जखमी झाले. हा अपघात बुधवारी (ता.१४) रात्री महूद शिवारात घडला आहे. रियांश सागर व्हनमाने (वय ३, रा. गोरेगांव, मुंबई) असे मृत मुलाचे नाव आहे.



महूद अंतर्गत असलेल्या केसकरवाडी येथील नेताजी मधुकर लवटे हे त्यांची पुतणी वर्षा जानकर हिच्या डोहाळ जेवणाच्या कार्यक्रमासाठी वाकी शिवणे (ता. सांगोला) येथे गेले होते. रात्री कार्यक्रम संपवून नेताजी लवटे यांच्यासह उर्मिला व्हनमाने, सोनाली भानवसे, ललिता केसकर व लहान मुले रियांश व्हनमाने व अथर्व भानवसे हे सगळेजण राजेंद्र केसकर यांच्या टाटा इंडिगो कारमध्ये (एम एच ४५ ए २०९५) बसले. तर दुसऱ्या स्विफ्ट डिझायरमध्ये (एमएच ४५ एडी ३१०५) विनायक लवटे, विमल लवटे, नंदाबाई बंडगर, पूजा ढोले, वैशाली लवटे हे बसले होते. या कार महूद शिवारात आल्यावर काही कारणास्त रस्त्याच्या बाजूला थांबल्या. त्याचवेळी आयशर टेम्पोने (एमएच ०३ ईजी ०५७५) टाटा इंडिगोला जोराची धडक दिली. ही कार पुढे उभ्या असलेल्या स्विफ्ट कारला जाऊन धडकली. आयशर टेम्पोने या दोन्ही कारला पाठीमागून जोरात ढकलत पुढे ५० फूट नेले. या अपघातात दोन्ही कारमधील सर्व जखमी झाले. त्यांना उपचारासाठी पंढरपूर येथील खासगी रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना रियांश व्हनमाने या बालकाचा मृत्यू झाला. आयशर टेम्पोचालक सागर अरुण खरात (रा. चेंबूर मुंबई) यास पोलिसांनी अटक केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



संरक्षण काल उन्हापासून, आता पावसापासून...


संगम श्री डे
578-06-899

संगम श्री नाईट
789-49-126

कल्याण
288-83-157

मुंबई
299-09-234


# नगररचना उपसंचालकाकडे ईडीला मोठे घबाड सापडले

## २३ कोटींचे सोने, ८ कोटी रोकड हस्तगत

✔ **ठाणे : ठाणे-वसई विरार महापालिका क्षेत्रातील बेकायदेशीर जमीन विकास आणि मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने मोठी कारवाई केली आहे. वसई विरार महापालिकेचा एक वरिष्ठ अधिकारी यात सापडला आहे. त्याच्याकडील मोठे घबाड ईडीच्या हाती लागले आहे.**

या प्रकरणाचा तपास करत असलेल्या सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मुंबई आणि हैदराबादमधील १३ ठिकाणी छापे टाकून ३२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची बेहिशेबी मालमत्ता जप्त केली आहे. मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) तरतुदींनुसार १४ आणि १५ मे रोजी करण्यात आलेल्या छाप्यांमध्ये ९.०४ कोटी रुपये रोख आणि सुमारे २३.२५ कोटी रुपये किंमतीचे हिऱ्यांनी जडलेले दागिने आणि सोने जप्त करण्यात आले.

### नगररचना उपसंचालकाने जमवली कोट्यवधींची मालमत्ता

ईडीने वसई विरार मनपाचे नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या मुंबई आणि हैदराबाद येथील निवासस्थानांवर धाडी टाकल्या. यावेळी ८.६ कोटी रुपये इतकी रोख रक्कम आढळून आली. तर २३.२५ कोटी रुपयांचे दागिने आणि सोने जप्त करण्यात आले. वसई विरार प्रदेशात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बांधकाम घोटाळा उघडकीस आणणारे कागदपत्रेही तपासकर्त्यांना सापडली आहेत. ज्याचा आरोप मनपा अधिकाऱ्यांशी संगनमत करून केला गेला होता.

### इमारतींचा बेकायदेशीरपणे विकास

वसई-विरार प्रदेशात ४१ मिश्र वापराच्या इमारतींच्या बेकायदेशीर विकासात सहभागी असलेल्या एका सिंडिकेटला लक्ष्य करून मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा २००२ अंतर्गत केलेल्या तपासाचा भाग म्हणून हे छापे टाकण्यात आले. वसई-विरार मनपाने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि डंपिंग ग्राउंडसाठी राखीव ठेवलेल्या सुमारे ६० एकर जमिनीवर या इमारती बांधल्या गेल्या होत्या. ईडीच्या सूत्रांनुसार, या सिंडिकेटने नगरपालिकेच्या मंजुरी बनावट केल्याचा आणि अतिक्रमित सार्वजनिक जमिनींवर बांधलेल्या निवासी आणि व्यावसायिक मालमत्ता विकल्याचा आरोप आहे. यामुळे शहरी नियोजन आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाले आहे. या रॅकेटमध्ये मुंबई आणि हैदराबादमधील बनावट कंपन्या आणि मनी लाँडरिंग चॅनेलचे एक जटिल जाळे असल्याचे म्हटले.

### अनेकांच्या पोलिसांत तक्रारी

मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाने अनेक बिल्डर्स, स्थानिक कार्यकर्ते आणि इतरांविरुद्ध नोंदवलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीने तपास सुरू केला. वसई विरार महानगरपालिकेच्या अधिकारक्षेत्रात सरकारी आणि खासगी जमिनीवर निवासी-कम-व्यावसायिक इमारतींच्या बेकायदेशीर बांधकामाशी संबंधित हा खटला २००९ पासून सुरू आहे.



### राखीव जमिनीवर बांधल्या ४१ जमिनी

ईडी अधिकाऱ्यांच्या मते, वसई-विरारच्या मंजूर विकास आराखड्यानुसार सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनीवर कालांतराने ४१ इमारती बेकायदेशीरपणे बांधण्यात आल्या, ज्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि डंपिंग ग्राउंड यांचा समावेश आहे. आरोपींनी गृहखरेदीदारांची दिशाभूल करण्यासाठी मंजुरीची कागदपत्रे बनावट केल्याचा आरोप आहे, बांधकामे अनधिकृत आहेत आणि पाडण्याच्या अधीन आहेत याची पूर्व माहिती असूनही निवासी युनिट्स विकल्या. ''हे पद्धतशीर फसवणुकीचे प्रकरण होते, ज्यामध्ये विकासकांनी जाणूनबुजून कायदेशीर मंजुरी नसलेल्या इमारतींमध्ये युनिट्स विकून जनतेची फसवणूक केली,'' असे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### न्यायालयाच्या आदेशानंतर इमारती पाडल्या

हे प्रकरण न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचले आणि मुंबई उच्च न्यायालयाने ८ जुलै २०२४ रोजी दिलेल्या आदेशात सर्व ४१ बेकायदेशीर बांधकामे पाडण्याचे निर्देश दिले. बाधित कुटुंबांनी दाखल केलेली विशेष रजा याचिकेनंतर सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यानंतर, व्हीव्हीएमसीने न्यायालयाच्या आदेशानुसार इमारत पाडण्याचे काम केले, जे २० फेब्रुवारी २०२५ रोजी पूर्ण झाले. ईडी अधिकाऱ्यांनी सांगितले की, चालू असलेल्या तपासात आर्थिक व्यवहारांची अधिक तपासणी केली जाईल, त्यात सहभागी असलेल्या व्यक्ती आणि संस्थांचे संपूर्ण नेटवर्क ओळखले जाईल आणि या प्रकरणात झालेल्या मनी लाँड्रिंग आणि फसवणुकीची व्याप्ती निश्चित केली जाईल.

CMYK